दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १९३ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार, दि.१८ मे २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडव्हेंचर पार्क

## अमरावती महापालिका निवडणूक भाजप एकटा लढणार

# कोणत्याच पक्षासोबत युती करणार नाही;नवनीत राणा यांची मोठी घोषणा

अमरावती (वृत्तसंस्था)–राज्यात राजकीय पक्षांना महापालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. सुप्रीम कोर्टाने आदेश दिल्यानंतर पुढील काही दिवसांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा होणार आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष तयारीला लागले आहे. अशातच भाजप नेत्या व माजी खासदार नवनीत राणा यांनी अमरावतीमधून मोठी घोषणा केली आहे. अमरावती महानगरपालिका निवडणूक भाजप स्वबळावर लढणार असल्याचे नवनीत राणा यांनी म्हटले आहे. त्यांच्या या घोषणेमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून विविध चर्चांना सुरुवात झाली आहे.नवनीत राणा यांनी स्वबळाची घोषणा करून एकप्रकारे महापालिका निवडणुकीसाठी रणशिंगच फुंकले आहे. महानगरपालिका निवडणुकीत भाजप कोणत्याही पक्षासोबत युती करणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. तसेच अमरावती महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती अशा प्रत्येक ठिकाणी भगवा आणि भाजपाचा झेंडा फडकला पाहिजे, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले आहे.

### महायुतीत विसंवादाचे संकेत?

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका महायुती म्हणून लढणार असल्याचे महायुतीच्या तिन्ही मोठ्या नेत्यांनी याआधीच म्हटले आहे. मात्र, नवनीत राणा यांनी अमरावती महानगरपालिकासाठी आपली भूमिका स्पष्ट केल्यानंतर महायुतीमधील इतर घटक पक्ष काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भाजपसह शिंदे गट व अजित पवार यांच्यासह इतर घटक पक्ष अमरावती महापालिकेच्या निवडणुकीत एकत्र लढणार, की स्वतंत्र मार्ग स्वीकारणार? हे आता पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



अमरावती महानगरपालिकेवर भाजपचा झेंडा दिसणार, कोणासोबत युती करणार नाही. फार घाबरायचे नाही. भाजपे हा पक्ष घाबरणारा नाही. मी अपक्ष खासदार असताना देखील पाच वर्ष प्रत्येक दिवस भाजपसाठी काम करत होते. मी हवेमध्ये बोलणारी व्यक्ती नाही. मी जमिनीवर जावून लोकांची सेवा करणारी, काम करणारी व्यक्ती आहे, असे नवनीत राणा यांनी म्हटले आहे.

### अमरावती पालिकेवर भाजपचाच झेंडा दिसणार

पावसाळा संपण्याआधीच महानगरपालिकेच्या निवडणुका होतील. पावसाळा संपण्याच्या आधीच महानगरपालिकेच्या निवडणुका संपणार आहेत. अमरावती महानगरपालिकेवर भाजपचा झेंडा दिसणार आहे. त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे, असे आवाहनही त्यांनी कार्यकर्त्यांना केले. २०२४ च्या निवडणुकीत माझा आत्मविश्वास कायम होता. विधानसभा निवडणुकीत काही जणांनी खेळ केला, पण तो चालला नाही, असे सांगत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला. अभी तो ये झांकी है, पिक्चर अभी बाकी है, असा इशाराही त्यांनी विरोधकांना दिला.

---

## वरोऱ्याच्या तायक्वांडोपटूंचा राष्ट्रीय पातळीवर डंका!

# राज्यस्तरीय स्पर्धेत झळाळती कामगिरी अनेकांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

वरोरा । प्रतिनिधी

नाशिक येथे ११ ते १३ मे २०२५ दरम्यान पार पडलेल्या ७व्या महाराष्ट्र राज्य कॅडेट क्युरोगी व पूमसे तायक्वांडो स्पर्धा तसेच ३४व्या महाराष्ट्र राज्य ज्युनिअर क्युरोगी व पूमसे स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून ८०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला. या अत्यंत स्पर्धात्मक वातावरणात चंद्रपूर जिल्हा आणि वरोरा शहरातील खेळाडूंनी भक्कम कामगिरी करत आपला ठसा उमटवला.

एअरबॉर्न तायक्वांडो अकॅडमी वरोरा, ANC तायक्वांडो अकॅडमी वरोरा आणि पँथर्स स्पोर्ट्स क्लब चंद्रपूर या नामवंत अकॅडम्यांतील खेळाडूंनी आपल्या जोरदार कामगिरीने राष्ट्रीय पातळीवरील निवड निश्चित केली. पूमसे प्रकारात प्रेरणा नागपुरे, अंतरा लांजेकर, अंशु भोई यांनी सुवर्ण पदक पटकावत थेट नॅशनलसाठी निवड मिळवली.

क्युरोगी प्रकारात कॅडेट गटातील अंतरा लांजेकर, विधी भागेकर, कावेरी किनाके, रोणित सुडम, मानसी दास, पूर्वेश अग्रवाल आणि ज्युनिअर गटातील संजना रॉय, यथार्थ नंदनवार यांनी आपली छाप पाडली. विशेषतः मानसी दास हिने कॅडेट मुलींच्या गटात कांस्यपदक पटकावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.या यशामागे कठोर मेहनत, प्रशिक्षकांचे कसून मार्गदर्शन आणि पालकांचे आर्थिक व मानसिक पाठबळ आहे. ग्रामीण भागातील खेळाडूंना पोषण, वेळेवर प्रशिक्षण आणि स्पर्धेपूर्व तयारी मिळवून देण्यामागे पालकांचे समर्पण मोलाचे ठरले आहे.प्रशिक्षक सचिन बोंधाणे, आकाश भोयर, अक्षय हनुमंते यांचे समर्पित प्रशिक्षण, तसेच अमन टेमुर्डे, श्सागर कोहळे, तानाजी बैसकर, बजरंग वानखडे (NIS कोच व आशियाई पदक विजेते), आणि मुकेश पांडे यांच्या दिग्दर्शनामुळेच ही कामगिरी शक्य झाली.



### वरोरा–चंद्रपूरच्या क्रीडा परंपरेला मिळाला नवा मान

**या खेळाडूंनी फक्त पदकंच नाही, तर वरोरा व चंद्रपूरच्या क्रीडा परंपरेला नवी ऊर्जा दिली आहे. स्थानिक पातळीवरील खेळाडूंना मिळणारे हे यश इतरांसाठीही प्रेरणादायी ठरेल, यात शंका नाही.**

---

## आरोग्य केंद्राजवळ गांज्याची बेकायदेशीर विक्री!

# रांजणगावात कारवाई; १७ हजारांचा साठा जप्त, एकाला अटक

शिरूर । रमेश बनसोडे

रांजणगाव गणपती (ता. शिरूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मागील परिसरात गांज्याचा बेकायदेशीर साठा विक्रीसाठी तयार ठेवलेल्या इसमावर रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी धाड टाकून ८५४ ग्रॅम गांज्यासह त्याला अटक केली. बाजारभावानुसार या अमली पदार्थाची किंमत सुमारे १७ हजार रुपये आहे. ही कारवाई १४ मे रोजी दुपारी करण्यात आली.

दवाखान्याच्या मागे संशयास्पद हालचाली आढळून आल्याने पोलिसांनी दुपारी १.१५ वाजता छापा टाकला. यावेळी हेमंत लक्ष्मण पवार (वय ५०, रा. रांजणगाव गणपती) हा व्यक्ती गांज्याच्या साठ्यासह आढळून आला.

पोलिसांनी त्याच्याकडील मोठ्या प्लास्टिकच्या पिशवीत लहान अशा १८० पिशव्या तपासल्या असता, त्यामध्ये हिरवट रंगाचे पान, फुले, बिया आणि काड्यांचे मिश्रण असलेला गांजा आढळला. एकूण वजन ८५४ ग्रॅम असून त्याची किंमत १७,००० रुपये असल्याचे निष्पन्न झाले.

प्राथमिक तपासात आरोपी हा गांज्याचा साठा विक्रीसाठी सज्ज असल्याचे स्पष्ट झाले असून त्याच्याविरोधात अमली पदार्थ प्रतिबंधक अधिनियम १९८५ च्या कलम ८(क), २०(ब) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी पोलीस नाईक योगेश आनंदा गुंड (वय ४१, ब. नं. २८८८) यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पो. हवा भोस (३३७९) यांनी पूर्ण केली असून पुढील तपास सहायक फौजदार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.रांजणगाव परिसरात वाढत्या अमली पदार्थांच्या हालचालींना आळा घालण्यासाठी पोलिसांनी अधिक कठोर भूमिका घेण्याची गरज स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे. ही कारवाई ग्रामस्थांमध्ये चर्चेचा विषय ठरली आहे.



---

## तंत्रज्ञानाचा वापर समाजोपयोगी व्हावा–आ.किशोर जोरगेवार

# बी.टेक. प्रथम वर्ष २०२४–२५ सत्रासाठी 'फ्लेम डीके २५' कार्यक्रमाचे आयोजन

चंद्रपुर । प्रतिनिधी

आजचा काळ हा प्रगतीचा, विज्ञान–तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या विकासाचा काळ आहे. आज अनेक तरुण उच्च शिक्षण घेत आहेत, नव्या गोष्टी शिकत आहेत; परंतु त्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी किती होतोय, यावर विचार करणे गरजेचे आहे. तुम्ही शिकलेल्या तंत्रज्ञानाचा उपयोग समाजोपयोगी व्हावा असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

सरदार पटेल मेमोरियल सोसायटी (ईस्ट) व राजीव गांधी अभियांत्रिकी संशोधन व तंत्रज्ञान महाविद्यालय, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने बी.टेक. प्रथम वर्ष २०२४–२५ सत्रासाठी 'फ्लेम डीके २५' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात आमदार जोरगेवार बोलत होते. यावेळी सरदार पटेल मेमोरियल सोसायटी ट्रस्टचे अध्यक्ष विनोद दत्तप्रेय, कोषाध्यक्ष निनाद गडमवार, राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल चिताडे यांच्यासह इतर मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती.पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, तुम्ही यंत्र तयार करा, युक्त्या शोधा, उपाय सुचवा पण त्या केवळ आत्मकेंद्रित न राहता, समाजाच्या गरजांशी जोडल्या गेल्या पाहिजेत. आपल्या भागातील पाण्याची समस्या, शेतीतील अडचणी, आरोग्यसेवा, शिक्षणातील तांत्रिक अडथळे या सगळ्यांवर उपाय शोधायला तुम्ही पुढे आलात,तरच खऱ्या अर्थाने शिक्षणाचे चीज होईल. तुमचं शिक्षण, तुमचं ज्ञान, तुमचं कौशल्य हे केवळ नोकरीसाठी न वापरता, समाजासाठी, देशासाठी वापरा. आजचा कार्यक्रम केवळ एक कार्यक्रम नाही, तर विद्यार्थ्यांच्या भविष्याची नवी दिशा ठरवणारा, नेतृत्व, नवोन्मेष आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालणारा एक अत्यंत उपक्रम आहे. आजच्या युगात केवळ पदवी मिळवणे एवढेच पुरेसे नाही, तर आपण सृजनशील, दूरदृष्टी ठेवणारे आणि समाजासाठी उत्तरदायी नागरिक होणे तितकेच आवश्यक आहे. या सारखे उपक्रम हे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारे, त्यांच्या प्रतिभेला चालना देणारे आणि भविष्यातील आघाडीचे नेतृत्व घडवणारे आहेत. केवळ नोकरी मिळवायची नाही, तर नवे रोजगार निर्माण करायचे. केवळ तंत्रज्ञान शिकायचे नाही, तर त्याचा समाजोपयोग कसा होईल याची चाचपणी करा. तुम्ही उद्याचे संशोधक, उद्योजक आणि परिवर्तन घडवणारे बना असे आवाहन यावेळी बोलतांना आ. जोरगेवार यांनी केले. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



---

## पिशोरमध्ये पैशाच्या वादातून धारदार शस्त्राने खून

# पोलिसांच्या दुर्लक्षामुळे आरोपीची हिम्मत वाढल्याचा नातेवाईकांचा आरोप

पिशोर । जावेद शेख

पिशोर येथील झोपडपट्टी परिसरात शनिवारी (ता. १७) रात्री ९ वाजता जुन्या वादातून एका व्यक्तीचा धारदार शस्त्राने खून करण्यात आला. शेख शकील शेख जमील (वय ४०) असे मृत व्यक्तीचे नाव असून, अलीम सलीम पठाण (वय २५) या तरुणावर खून केल्याचा संशय आहे. या घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाला असून, नागरिकांनी पोलिसांवर पूर्वी केलेल्या तक्रारीकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करत निषेध व्यक्त केला.

मयत शकील शेख हे झोपडपट्टी भागात राहून बांधकाम मजुरी करत होते. संशयित अलीम पठाण याच्याशी त्यांचा सात महिन्यांपूर्वी किरकोळ कारणावरून वाद झाला होता. त्यावेळी अलीमने कुऱ्हाडीने हल्ला केला होता. त्यानंतर तीन आठवड्यांपूर्वी मजुरीच्या पैशावरून पुन्हा वाद झाल्यानंतर अलीमने धारदार शस्त्राने वार करून शकीलला जखमी केले होते. त्या हल्ल्यात त्यांच्या हाताला गंभीर दुखापत झाली होती.



या घटनेनंतर शकील शेख व त्यांची पत्नी पिशोर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी गेले होते. मात्र पोलिसांनी तक्रार नोंदवण्याऐवजी त्यांना परत पाठवले, असा गंभीर आरोप नातेवाईकांनी केला आहे. पोलिसांच्या या दुर्लक्षामुळे आरोपीच्या मनातील भीती संपली आणि त्याने पुन्हा हल्ला करून शकील यांचा जीव घेतला, असे संतप्त नातेवाईकांनी सांगितले.

शनिवारी रात्री अलीम पठाण थेट शकील यांच्या घरात शिरला. तेव्हा शकील पलंगावर मोबाईल पाहत होते. त्या क्षणी अलीमने त्यांच्या छातीत धारदार शस्त्राने वार केला आणि पळून गेला. घरातील लोकांनी तत्काळ त्यांना पिशोर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉ. घोडके यांनी तपासून त्यांना मृत घोषित केले.मृत शकील यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली आणि दोन मुले असा परिवार आहे. अचानक झालेल्या या घटनेमुळे संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. परिसरात शोककळा पसरली आहे.

घटनेनंतर रात्री शेकडो नागरिक पिशोर पोलिस ठाण्यासमोर जमा झाले. पोलिसांच्या हलगर्जीपणामुळेच हा प्रकार घडल्याचा आरोप करत त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. काही वेळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. याप्रकरणी पोलिसांनी आता घटनेचे गांभीर्य ओळखून पुढील तपास सुरू केला आहे.

# ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मान्सूनपूर्व आढावा बैठक पार पडली

**बदलापूर । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री व ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात मान्सूनपूर्व बैठक पार पडली यावेळी आगामी मॉन्सूनच्या पार्श्वभूमीवर कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांना सज्ज राहण्याचे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी दिले खरीप हंगाम आढावा बैठकीत गतवर्षीच्या खरीप हंगामाचा आढावा घेताना एसआरटी राईस टेक्नीकलला प्रोत्साहन देऊन त्याचे लागवड क्षेत्र वाढवावे शेतकऱ्यांच्या गटशेतीला प्रोत्साहन देऊन फुले, सुरण, फणस, आवाकाडो अशा अधिक नगदी उत्पन्न देणाऱ्या पिकांना प्राधान्य द्यावे. जिल्ह्यातील जलस्रोतांचे खोलीकरण व रुंदीकरण करून जास्त पाणी साठेल याची दक्षता घ्यावी जेणेकरून पावसाळ्यानंतरही पिके घेता येणे शक्य होईल.

ॲग्रीस्टेक योजनेचे डिजिटलायझेशन करावे. जलयुक्त शिवार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी. भेसळयुक्त पिके बियाण्यावर कारवाई करण्यासाठी भरारी पथके स्थापन करावी. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई तात्काळ मिळावी. बांबू लागवडीचे क्षेत्र वाढवावे, पारंपरिक शेतीला आधुनिक शेतीची जोड द्यावी व जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाचा विभागवार आढावा घेऊन काही महत्वपूर्ण सूचना केल्या असून यात प्रामुख्याने कोणत्याही यंत्रणेच्या अखत्यारीतील रस्ते असले तरीही ते त्या त्या महानगरपालिकांनी तात्काळ बुजवावे आणि त्यानंतर संबंधित यंत्रणेकडून त्याची बिले वसूल करावी असे उपमुख्यमंत्री व ठाण्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून सांगितले गेले. तसेच नालेसफाई पूर्ण करून रेल्वेच्या हद्दीतील नाले आणि कल्व्हर्ट स्वच्छ करण्याला प्राधान्य द्यावे. आपत्ती काळात स्कुबा डायव्हर्स तैनात करावे. धोकादायक इमारतीचे वर्गीकरण करून त्यात राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवावे, धोकादायक वृक्षांची छाटणी करावी, पावसाळ्यात होणारी वाहतूक कोंडी पाहता अधिक वॉर्डन तैनात करावे, औषधे आणि अन्नाचा साठा करून ठेवावा. एनडीआरएफची दोन पथके आणि टीडीआरएफचे पथक सज्ज ठेवावे असे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी दिले बदलापूर, कल्याण आणि भिवंडी शहर येथे मान्सून दरम्यान उद्भवणाऱ्या समस्यांकडे खासदार बाळ्यामामा म्हात्रेने लक्ष वेधले. दरवर्षी पावसामुळे ठराविक ठिकाणी पाणी साचते, त्यामुळे परिसर काही तास ठप्प होतो. या सर्व ठिकाणांची



माहिती सविस्तरपणे मा. मंत्रिमहोद्यांच्या निर्दशनास आणून दिली.अधिकार्यांना यावर्षीच्या मान्सूनपूर्व तयारीमध्ये अधिक दक्षता घेण्याच्या सूचना खासदार म्हात्रे यांच्या वतीने देण्यात आल्या आहेत. नालेसफाई, गटारींची स्वच्छता व पाण्याचा योग्य निचरा यावर विशेष भर देण्याच्या सूचना म्हात्रे यांसकडून करण्यात आल्या आहेत मुरबाड मतदारसंघातील मॉन्सून पूर्व कामासह शेती, रस्ते, वीज, पाणी आणि आपत्ती व्यवस्थापन संदर्भातील उपाययोजनांवर चर्चा केली असून मॉन्सूनच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणाऱ्या साहित्याची उपलब्धता, सेंद्रिय खतांना प्राधान्य आणि पारंपारिक शेतीला आधुनिकतेची जोड देण्यासाठी कृषी विभागाचे लक्ष वेधले. पालकमंत्र्यांनी याविषयाची दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या असल्याचे मुरबाड विधान मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी सांगितले एसआरटी राईस टेक्नीकलला प्रोत्साहन देऊन त्याचे लागवड क्षेत्र वाढवावे. शेतकऱ्यांच्या गटशेतीला प्रोत्साहन देऊन फुले, सुरण, फणस, आवाकाडो अशा अधिक नगदी उत्पन्न देणाऱ्या पिकांना प्राधान्य देण्यास सांगितले.नालेसफाई, जलस्रोतांचे खोलीकरण-रुंदीकरण, जीर्ण झालेल्या विद्युत खांब बदलणे, वृक्ष छाटणी तसेच कल्याण तालुक्यातील रायते येथील सुरू असलेल्या नवीन पुलाचे आणि त्याला जोडणाऱ्या रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे. या कामासाठी करण्यात आलेल्या भरावामुळे येत्या पावसाळ्यात रायते गावाला पुराचा धोका निर्माण होऊ शकतो. यावर पालकमंत्र्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना विषयाचे गांभीर्य राखून कथोरे यांनी केलेल्या सूचना मार्गी लावण्याचे निर्देश दिले. यावेळी खासदार नरेश म्हस्के, खासदार बाळ्यामामा म्हात्रे, आमदार किसन कथोरे आमदार शांताराम मोरे, आमदार डॉ.बालाजी किणीकर, आमदार सुलभा गायकवाड, उपजिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी अपर जिल्हाधिकारी संदीप माने, ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुम्बरे, मीरा भाईंदर पोलीस आयुक्त मधुकर पांडे आणि एमएमआरडीए, एमएसआरडिसी, रेल्वे अशा विविध यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

# रंगनाथ स्वामी पतसंस्थेच्या आर्थिक गैरव्यवहारावर उच्च न्यायालयाची नजर-विशेष लेखापरीक्षणाचे आदेश

**वणी । प्रतिनिधी**

शेकडो कोटींच्या ठेवींचे भविष्य अंधारात टाकणाऱ्या वणी येथील 'रंगनाथ स्वामी नागरी सहकारी पतसंस्थे'तील आर्थिक अनियमिततेप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने गंभीर दखल घेतली आहे. पतसंस्थेच्या १०० कोटी रुपयांच्या बेकायदेशीर कर्जवाटपासंदर्भात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करत न्यायालयाने २८ एप्रिल २०२५ रोजी दिलेल्या आदेशात विशेष लेखापरीक्षण (Special -udit) करण्याचे निर्देश दिले आहेत.




या प्रकरणात अमोल पुरुषोत्तम नावडे यांनी राज्य सरकार, सहकार आयुक्त, निबंधक आणि पतसंस्थेच्या संचालक मंडळाविरुद्ध जनहित याचिका क्रमांक २३०८/२०२५ दाखल केली होती. त्यांनी पतसंस्थेच्या कारभारात प्रचंड आर्थिक घोटाळा झाल्याचा आरोप केला असून, ठेवीदार आणि सभासदांचे कोट्यवधी रुपये धोक्यात आल्याचा इशारा दिला आहे.

न्यायमूर्ती नितीन संभरे आणि न्यायमूर्ती वृषाली जोशी यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत राज्य सरकारतर्फे सहाय्यक शासकीय वकील आय.जे. डामले यांनी प्रतिज्ञापत्रावर सेवा नाकारली. मात्र, खंडपीठाने प्रतिवादी क्रमांक २ व ३ यानी ३० जानेवारी २०२४ रोजी दिलेल्या लेखापरीक्षण आदेशाची अंमलबजावणी का झाली नाही, याचे उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच लेखापरीक्षण किती काळात पूर्ण होणार याबाबत स्पष्टीकरण मागवण्यात आले आहे.


याचिकाकर्ता नावडे यांनी आपल्या याचिकेत दावा केला आहे की, पतसंस्थेने आपल्या संचालक मंडळातील सदस्यांचे नातेवाईक आणि मित्रमंडळी यांना प्रत्येकी १ कोटी रुपयांचे बनावट कर्ज वाटप केले असून, अशा प्रकारे जवळपास ८० कोटींचे गैरकर्ज वाटप झाल्याचे पुरावे त्यांनी न्यायालयात सादर केले आहेत. याशिवाय स्थावर मालमत्ता खरेदीतही कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.यवतमाळ जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात ही पतसंस्था एक मोठे नाव मानली जाते. मात्र, सद्यःस्थितीत तिची आर्थिक स्थिती ढासळलेली आहे आणि यामुळे ठेवीदारांच्या पैशांचे संरक्षण होणे अत्यावश्यक झाले आहे. न्यायालयाच्या आदेशामुळे आता सहकार आयुक्त, जिल्हा लेखा परीक्षक आणि संबंधित यंत्रणांवर स्पष्टीकरण देण्याची जबाबदारी आली आहे.

## बोथली (लोहारा) फाट्याजवळ दुचाकींची समोरासमोर धडक : सुरेश दडमल यांचा मृत्यू, एक गंभीर जखमी

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील उसेगाव येथील रहिवासी सुरेश दडमल (वय ४८) यांचा १६ मे रोजी दुपारी दुचाकी अपघातात मृत्यू झाला. बोथली (लोहारा) फाट्याजवळ दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या या भीषण अपघातात रतन दडमल हे किरकोळ जखमी झाले असून, या घटनेने नेरी व चिमूर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरेश दडमल आणि त्यांचे साथीदार रतन दडमल हे नागभीड तालुक्यातील सारंगड येथे कामानिमित्त गेले होते. दुपारी सुमारे २ वाजता परत येत असताना बोथली (लोहारा) फाट्याजवळ समोरून येणाऱ्या दुचाकीची त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक बसली. यात सुरेश दडमल यांना गंभीर दुखापत झाली तर रतन दडमल किरकोळ जखमी झाले. अपघातानंतर तातडीने दोघांनाही चिमूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र सुरेश दडमल यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी ब्रम्हपुरी येथे हलविण्यात आले. परंतु नागभीड जवळ पोहोचत असतानाच



त्यांची प्राणज्योत मालवली. शवविच्छेदन चिमूर येथील उपजिल्हा रुग्णालयात करण्यात आले.

सुरेश दडमल हे चिमूर तालुक्यात कुशल इलेक्ट्रीक मेकॅनिक व प्लंबर म्हणून परिचित होते. गावातील व शेतांमधील वीज कामे ते सातत्याने करत असत. त्यांच्या अकस्मात निधनामुळे नेरी परिसरात व उसेगावमध्ये शोककळा पसरली आहे.त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी तसेच मोठा आप्तपरिवार आहे. १७ मे रोजी दुपारी ११ वाजता उसेगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीप्रसंगी ग्रामस्थ व नातेवाईकांनी अश्रुपूरित श्रद्धांजली अर्पण केली.

### रक्त घ्या, पण न्याय द्या!

# पालकमंत्र्यांच्या घरासमोर रक्तदान करून प्रहार जन शक्तीचं आक्रोश आंदोलन

## शेतकऱ्यांची कर्जमाफी, हमीभाव आणि दिव्यांगांना मानधनासाठी झणझणीत आवाज




**परभणी । लक्ष्मण उजगरे**

आम्ही तुमच्याकडे मदतीची याचना करत नाही... आमचं रक्त देतोय, पण आता तरी न्याय द्या! असा थेट सवाल करत प्रहार जनशक्ती पक्षाने परभणीत बुधवारी (दि. १४) एक असामान्य आंदोलन उभारलं. जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या घरासमोर थेट रक्तदान करत सरकारला जबाबदारीची जाणीव करून दिली.

छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यभरातील मंत्री व राज्यमंत्र्यांच्या निवासस्थानासमोर हे आंदोलन झाले. परभणीत जिल्हा प्रमुख शिवलिंग बोधने यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनाला झंझावाती स्वरूप आलं. आंदोलनकर्त्यांनी सांगितलं, शब्द नकोत, आता कृती पाहिजे!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेली संपूर्ण कर्जमाफीची हमी अद्याप हवेतच विरली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची सातबारा कोरा करा, शेतमाल हमीभावाने खरेदी करा आणि खरेदी न करणाऱ्यांवर कारवाई करा, अशी आग्रही मागणी करण्यात आली. दिव्यांग बांधवांसाठी मासिक सहा हजार रुपये मानधनही तातडीने लागू करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.या आंदोलनात रामेश्वर जाधव, उद्धव गरुड, दीपक खुडे, अशोक मस्के, संजय वाघमारे, अंकुश गिरी, वैभव संघई, केशव जाधव, सिद्धेश्वर आगलावे, पवन जोगदंड यांच्यासह २६ कार्यकर्त्यांनी रक्तदान करून सरकारच्या कानावर शब्द नव्हे तर रक्त सांडून थेट न्यायाची हाक दिली.प्रशासनाने या रक्ताचे मोल ओळखून निर्णय घेतले, तरच या आंदोलनाचा अर्थ राहील... अन्यथा शेतकरी, दिव्यांग आणि सामान्य माणसाचं रक्त अजून किती सांडावं लागेल?

# माजी आमदार अमित घोडा यांचे शिवसेनेत पुनरागमन

## भाजपला रामराम; एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत दमदार प्रवेश



### लोकशाहीतील नेतृत्वाची दुसरी इनिंग

**स्व. आमदार कृष्णा घोडा यांचे सुपुत्र असलेल्या अमित घोडा यांनी बँकेतील नोकरी सोडून लोकसेवेची वाट निवडली. पोटनिवडणुकीत मोठ्या मताधिक्याने आमदारकी मिळवून त्यांनी आपल्या नेतृत्वाची ताकद दाखवून दिली. जनतेशी थेट संवाद, कार्यकर्त्यांशी घट्ट नाते आणि संयमित भूमिका हे त्यांच्या राजकीय कारकीर्दीतील खरे बळ ठरले.**

**पालघर । नितीन बोंबाडे**

राजकीय संघर्ष, कार्यकर्त्यांची भावना आणि नेतृत्वाबाबतचा विश्वास या साऱ्यांचा विचार करत माजी आमदार अमित घोडा यांनी अखेर शिवसेनेच्या शिंदे गटात पुनरागमन केले. भाजपमधील अपूर्ण आश्वासने आणि दुर्लक्षामुळे नाराज झालेल्या घोडा यांनी, जिल्हा परिषद सदस्या अमिता घोडा व शेकडो कार्यकर्त्यांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.या प्रवेशामुळे पालघर जिल्ह्याचे राजकीय गणित पूर्णपणे ढवळून निघाले आहे. जिल्हाध्यक्ष कुंदन संखे, आमदार राजेंद्र गावीत यांच्यासह अनेक वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घडलेला हा प्रवेश भविष्यातील राजकीय समीकरणांवर मोठा परिणाम करू शकतो.

### वादळापाठचं शांत राजकारण संपलं!

**अमित घोडा यांचा हा प्रवेश म्हणजे केवळ पक्षांतर नसून, स्थानिक असंतोषाचा उद्रेक आहे. २०१९ मध्ये शिवसेनेच्या तिकिटाविना अर्ज मागे, नंतर भाजपकडून उमेदवारीचे आश्वासन, आणि २०२४ मध्ये पुन्हा तिकिट नाकारल्याने नाराजी – या सर्व घटनांनी घोडा यांची भूमिका अस्थिर झाली होती. अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्यानंतरही पुन्हा एकदा मागे हटावे लागले.**

### शिवसेनेतून नव्या वाटचालीची सुरुवात

**आता पुन्हा एकदा शिवसेनेच्या माध्यमातून ते स्थानिक नेतृत्वासाठी आशेचा किरण ठरू शकतात. कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, त्यांच्या या निर्णयाचे स्वागत करण्यात आले आहे. हा प्रवेश फक्त एक राजकीय चालीचा भाग नसून, तो स्थानिक अस्मिता, जनतेच्या अपेक्षा आणि राजकीय पुनर्वसनाची सुरुवात मानली जात आहे.आता हे नेतृत्व पक्षाच्या वचनपूर्तीस न्याय देतं का, आणि आगामी निवडणुकांमध्ये घोडा यांची भूमिका काय ठरेल, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.**

# ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने निसर्गानुभव कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न

**चिमूर । प्रतिनिधी**

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या कोर व बफर क्षेत्रात दिनांक १२ मे २०२५ रोजी बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने निसर्गानुभव कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी व्याघ्र प्रकल्पाच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन आरक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.कार्यक्रमात कोर क्षेत्रातील ९६ मचानावर व्याघ्र प्रकल्पातील अधिकारी व कर्मचारी तसेच बफर क्षेत्रातील ८१ मचानावर एकूण १६२ निसर्गप्रेमींनी सहभाग घेतला.ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या कोर विभागात मोहर्ली, ताडोबा, कोळसा, कोलारा आणि कारवा असे पाच वनपरिक्षेत्र असून, बफर विभागात पळसगाव चंद्रपूर, मूल, शिवणी, खडसंगी आणि मोहर्ली असे सहा वनपरिक्षेत्र आहेत.या निसर्गानुभव कार्यक्रमादरम्यान निसर्गप्रेमींनी विहित प्रपत्रांमध्ये नमूद केलेल्या प्राण्यांची नोंद घेतली. या प्राण्यांमध्ये वाघ, मोर, बिबट्या, रानकोंबडा, अस्वल, ससा, रानकुत्रा, सायाळ, मुंगूस, चिंकारा, रानमांजर, तडस, चौशिंगा, उडती खार, माकड, उदमांजर, जवाडी मांजर, मगर, रानडुक्कर, चांदी अस्वल, चितळ, भेडकी इत्यादी सर्व वन्य प्राणी गणले गेले.या कार्यक्रमामुळे पर्यावरण जागृती, जैवविविधतेची जाणीव आणि वन्यजीव संवर्धनाबाबत जनतेमध्ये सकारात्मक संदेश पोहोचला आहे. भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम वनविभागाकडून सातत्याने राबविण्यात येतील, असे वनसंरक्षक आणि क्षेत्रसंचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.



# डोलारा येथे युवासेना शाखेचे भव्य उद्घाटन आलेख रट्टे यांच्या नेतृत्वात उत्स्फूर्त प्रतिसाद

**भद्रावती । प्रतिनिधी**

शहरातील डोलारा येथील चंडिका वॉर्डामध्ये युवासेनेची शाखा थाटामाटात सुरू करण्यात आली असून, या उद्घाटनप्रसंगी परिसरातील युवकांचा उस्फूर्त सहभाग आणि शिवसेनेच्या विचारांप्रती असलेला विश्वास प्रकर्षाने जाणवला. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले युवासेना जिल्हा प्रमुख आलेख रट्टे यांची प्रभावी उपस्थिती व ज्वलंत मार्गदर्शन. रट्टे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, युवासेना ही केवळ संघटना नसून युवकांना योग्य दिशा दाखवणारा जिवंत विचार आहे. शिवसेना पक्षप्रमुख ना .एकनाथ शिंदे, युवासेना प्रमुख खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक आणि कार्यकारिणी सदस्य हर्षल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली युवा सेना महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत विस्तारत असून, डोलारा



येथे सुरू झालेली शाखा हे त्याचेच ठळक उदाहरण आहे.

या उद्घाटन समारंभाला वरोरा-भद्रावती समन्वयक मुनेश्वर बदखल, वरोरा तालुका सचिव रितिक जाधव, युवा सैनिक राज चौहान, तसेच अमित घोडमारे, वेदांत गजबंद, भूषण जाधव यांच्यासह अनेक युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. डोलारा येथील शाखेची जबाबदारी सुमित मोइजे यांच्याकडे शाखा प्रमुख म्हणून सोपविण्यात आली असून, अनिरुद्ध रामटेके यांची शाखा संपर्क प्रमुख, सिद्धार्थ मेश्राम यांची शाखा सचिव, तर सचिन माहुरे यांची शाखा बुथ प्रमुख म्हणून निवड करण्यात आली. यासोबतच सागर इंगोले, आदित्य खोब्रागडे व येलेश राऊत या सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

कार्यक्रमाचे संपूर्ण वातावरण उत्साही आणि प्रेरणादायी होते. शाखेच्या उद्घाटनास उपस्थित असलेले सर्व मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी या नव्या सुरूवातीला यशस्वी करण्याचा संकल्प केला. युवासेनेच्या माध्यमातून गावागावातील युवकांना सामाजिक कार्याची आणि नेतृत्वाची संधी मिळावी या उद्देशाने डोलारा शाखेची स्थापना करण्यात आली असून, हा उपक्रम भविष्यातील नेतृत्व घडविणारा आणि समाजहिताचे कार्य करणारा एक मजबूत केंद्र बनणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# केळझर शिवारात विदेशी दारूची अवैध वाहतूक उघड;६.३६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

केळझर शिवारातील वर्धा-नागपूर महामार्गावर सेलू पोलिसांनी परदेशी दारूची अवैध वाहतूक करणाऱ्या एका आरोपीला अटक केली असून ६.३६ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई शुक्रवार, १६ मे रोजी सायंकाळी ६.३० वाजता करण्यात आली.

पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून एम.एच.३२ सी ९९५९ क्रमांकाची मारुती सुझुकी स्विफ्ट डिझायर कार नागपूरहून वर्ध्याकडे परदेशी दारू घेऊन येत असल्याचे समजले. त्यानुसार पोलिसांनी नाकाबंदी करून कारची झडती घेतली असता मोठ्या प्रमाणावर विदेशी दारू आढळून आली.झडतीमध्ये ऑफिसर चॉईस ब्लू, ऑफिसर चॉईस, बर्ग बीयर, आर.एस., आयकॉनीक आणि रॉयल चॅलेंज या ब्रँड्सच्या विविध पॅकेजिंगमधील एकूण १.२६ लाख किमतीची विदेशी दारू, १०,००० किमतीचा ओपो मोबाईल आणि ५ लाख किमतीची कार असा एकूण ६.३६ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणात आकाश राजेश तांबेकर (वय ३५, रा. सानेगुरुजी नगर, वर्धा) यास अटक करण्यात आली आहे. चौकशीतून ही दारू बादल दिवाकर धवणे (रा. इंदिरा नगर, वर्धा) याची असून, ती अभिषेक नयन चित्तलवार (रा. नागपूर) यांच्या बारमधून आणली गेल्याची माहिती समोर आली. तिघांवरही महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन, अप्पर पोलीस अधीक्षक सागर कवडे आणि कर्तव्यदक्ष उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मनोज गभने यांच्या नेतृत्वात पीएसआय किरण महाजन, पो. अं. कृष्णा माने आणि लोकेश पवनकर यांनी केली.

# हिंगणघाटमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी जागेची पाहणी; ४३० खाटांचे रुग्णालय उभारण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

हिंगणघाट येथे प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ४३० खाटांचे आधुनिक रुग्णालय यासाठी मौजा जांब येथील कृषि विभागाच्या अखत्यारीतील जागेची आज प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. त्यानंतर या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक पुढील टप्प्यांना औपचारिकरित्या प्रारंभ करण्यात आला.



या प्रकल्पासाठी व वापरासाठी संबंधित जागेचा अधिकृत ताबा आरोग्य विभागाकडे सुपूर्त करण्यात आला आहे. त्यासोबतच सार्वजनिक बांधकाम विभागाला (झथऊ) महाविद्यालय व रुग्णालयाच्या इमारतींचे आराखडे तयार करण्यासाठी आणि प्रत्यक्ष बांधकाम सुरू करण्यासाठी आवश्यक दस्तऐवजांचे हस्तांतरणही करण्यात आले. ही प्रक्रिया केवळ औपचारिक न राहता, संपूर्ण प्रकल्पास गती देणारे महत्त्वाचे पाऊल ठरले आहे.

या कार्यक्रमास जिल्हा प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी, कृषी विभागाचे प्रतिनिधी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते, आरोग्य विभागाचे अधिकारी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित नागरिकांमध्ये आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील प्रगतीबाबत आशा, उत्साह आणि समाधानाचे वातावरण दिसून आले.

या वैद्यकीय महाविद्यालयाच्या स्थापनेमुळे वर्धा जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे वैद्यकीय शिक्षण स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे. तसेच नव्याने उभारण्यात येणारे ४३० खाटांचे अद्ययावत रुग्णालय ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांसाठी आरोग्यसेवेच्या दृष्टीने एक मैलाचा दगड ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# श्रावणी हत्या प्रकरण : विवेक विचार मंचाचे जिल्हा संयोजक आशिष घुमे यांनी घेतली आसुटकर कुटुंबीयांची भेट

## न्यायासाठी संघर्षाला पाठिंबा देण्याची ग्वाही

**भद्रावती । प्रतिनिधी**

तालुक्यातील चोरा येथे अल्पवयीन श्रावणी रंदीप आसुटकर हिच्या निर्घृण हत्येनंतर संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर विवेक विचार मंचाचे चंद्रपूर जिल्हा संयोजक आशिष घुमे यांनी आसुटकर परिवाराची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

श्रावणीच्या हत्येने समाजमन सुन्न झाले असताना, या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई व्हावी व पीडित कुटुंबाला तात्काळ न्याय मिळावा यासाठी विवेक विचार मंच पीडित परिवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, असे आशिष घुमे यांनी यावेळी स्पष्ट केले.ते पुढे म्हणाले की, या प्रकरणातील तपास सीआयडीकडे वर्ग करून निष्पक्षपणे चौकशी व्हावी, यासाठी शासन व संबंधित यंत्रणांवर पाठपुरावा करण्यात येईल. पीडितेच्या कुटुंबावर अन्याय होऊ देणार नाही.या भेटीदरम्यान आसुटकर परिवारानेही




पोलिसांच्या निष्काळजी तपासाविषयी आपली व्यथा मांडली. यावेळी युवासेना चंद्रपूर जिल्हा प्रमुख आलेख रट्टे , विवेक विचार मंचाचे कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकही उपस्थित होते.

# प्रा.विनायक तराळे यांचे दु:खद निधन आनंदवनातील स्मृतीवनात अंत्यसंस्कार

**वरोरा । प्रतिनिधी**

आनंद निकेतन महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाचे सेवानिवृत्त विभागप्रमुख, विद्यार्थीप्रिय शिक्षक आणि नुटाचे आजीव सदस्य प्रा. विनायक गं. तराळे (वय ७६) यांचे शुक्रवार, १६ मे रोजी दुपारी २.३० च्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने दु:खद निधन झाले.



शनिवारी सकाळी ११ वाजता आनंदवनातील स्मृतीवनात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी महारोगी सेवा समितीचे सचिव डॉ. विकास आमटे, डॉ. विजय पोळ, सदाशिव ताजने कविश्वर काका यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

प्रा. तराळे यांनी आनंद निकेतन महाविद्यालयात विद्यार्थी म्हणून शिक्षण घेतल्यानंतर त्याच महाविद्यालयात रसायनशास्त्राचे अध्यापन करत एक प्रदीर्घ आणि समर्पित शैक्षणिक वाटचाल केली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण घडणीत महत्त्वाची भूमिका बजावली.

ते अत्यंत शिस्तबद्ध, कर्तव्यनिष्ठ, सहकार्यशील आणि आनंदवनातील विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणारे व्यक्तिमत्त्व होते. बाबा आमटे यांच्याशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते.

त्यांचे उत्कृष्ट संवादकौशल्य, नम्रता, सुंदर हस्ताक्षर, कार्यक्रमाचे काटेकोर नियोजन आणि सूक्ष्म तपशीलांकडे लक्ष हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष पैलू होते.त्यांच्या जाण्याने वरोरा परिसरातील शैक्षणिक, सामाजिक आणि वैचारिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

## अंगणवाडी पतसंस्थेची बिनविरोध निवडणूक पूर्ण

# संगीताताई तोरवणे चेअरमन, भीमाबाई चौरे व्हाईस चेअरमन

**धुळे । प्रतिनिधी**

साक्री येथील अंगणवाडी पतसंस्थेच्या संचालक मंडळाच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत चेअरमन व व्हाईस चेअरमन पदासाठी निवडणूक पार पडली. दोन्ही पदांकरिता प्रत्येकी एक अर्ज आल्यामुळे ही निवडणूक बिनविरोध झाली असून, संगीता नरेंद्र तोरवणे यांची चेअरमनपदी आणि श्रीमती भीमाबाई चौरे यांची व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड करण्यात आली.



प्रा. नरेंद्र तोरवणे यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक शांततेत पार पडली. अंगणवाडी पतसंस्था ही खडज मानांकन प्राप्त संस्था असून, तिची थकबाकी शून्य आहे, हे या संस्थेचं विशेष वैशिष्ट्य आहे.ही निवड जाहीर झाल्यानंतर पेरेजपूर रस्त्यावरील भव्य दिव्य अंगणवाडी कार्यालयात जल्लोष साजरा करण्यात आला.यावेळी संस्थेचे संस्थापक प्रा. नरेंद्र तोरवणे, महिला संचालक दीपाली भामरे, वैशाली पंखवाले, इंदुबाई गायकवाड, मनीषा पाटील, संगीता गर्दे, जयश्री कवचे, अनुबाई बर्डे, कार्यालयीन कर्मचारी उज्वल अग्निहोत्री, अमोल पाटील, धनश्री राठोड, शिवाजी राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.

# केळझर शिवारात विदेशी दारूची अवैध वाहतूक उघड; ६.३६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

केळझर शिवारातील वर्धा-नागपूर महामार्गावर सेलू पोलिसांनी परदेशी दारूची अवैध वाहतूक करणाऱ्या एका आरोपीला अटक केली असून ६.३६ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई शुक्रवार, १६ मे रोजी सायंकाळी ६.३० वाजता करण्यात आली.पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून एम.एच.३२ सी ९९५९ क्रमांकाची मारुती सुझुकी स्विफ्ट डिझायर कार नागपूरहून वर्ध्याकडे परदेशी दारू घेऊन येत असल्याचे समजले. त्यानुसार पोलिसांनी नाकाबंदी करून कारची झडती घेतली असता मोठ्या प्रमाणावर विदेशी दारू आढळून आली.

झडतीमध्ये ऑफिसर चॉईस ब्लू, ऑफिसर चॉईस, बर्ग बीयर, आर.एस., आयकॉनीक आणि रॉयल चॅलेंज या ब्रँड्सच्या विविध पॅकेजिंगमधील एकूण १.२६ लाख किमतीची



विदेशी दारू, १०,००० किमतीचा ओपो मोबाईल आणि ५ लाख किमतीची कार असा एकूण ६.३६ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणात आकाश राजेश तांबेकर (वय ३५, रा. सानेगुरुजी नगर, वर्धा) यास अटक करण्यात आली आहे. चौकशीतून ही दारू बादल दिवाकर धवणे (रा. इंदिरा नगर, वर्धा) याची असून, ती अभिषेक नयन चित्तलवार (रा. नागपूर) यांच्या बारमधून आणली गेल्याची माहिती समोर आली. तिघांवरही महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन, अप्पर पोलीस अधीक्षक सागर कवडे आणि कर्तव्यदक्ष उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मनोज गभने यांच्या नेतृत्वात पीएसआय किरण महाजन, पो. अं. कृष्णा माने आणि लोकेश पवनकर यांनी केली.

## माझ्या इतकी वीजेची कामे दुसऱ्या कोणी केली नाहीत-आमदारांचा दावा

# शेतकऱ्यांच्या वीज प्रश्नावर आमदार नारायण आबा पाटील ठाम;शेटफळ येथे अतिरिक्त ट्रान्सफॉर्मरच्या कामास सुरुवात

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांना वीजेच्या अडचणींना सामोरे जावे लागू नये, यासाठी मी सातत्याने काम करत आलो असून, माझ्या इतकी वीजेची कामे दुसऱ्या कोणीही केली नसतील, असे ठाम प्रतिपादन करमाळा मतदारसंघाचे आमदार नारायण आबा पाटील यांनी केले.

शेटफळ (नागोबाचे) येथे ३३/११ उपवीज केंद्राच्या सक्षमीकरणासाठी ५ एमव्ही क्षमतेचा अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर बसविण्याच्या कामाच्या भूमिपूजन कार्यक्रमात आमदार पाटील बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी दशरथ बापू लबडे होते. कार्यक्रमास विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.या कार्यक्रमात आमदार पाटील म्हणाले, सोलर पंपांचा पर्याय जरी शेतकऱ्यांना उपलब्ध करून देत असलो, तरी त्यातून वीजेच्या समस्या पूर्णतः सुटतीलच असे नाही. प्रत्येक शेतकऱ्याच्या क्षेत्रानुसार वीजेची गरज वेगळी असते. त्यामुळे पारंपरिक वीजपुरवठाही तितकाच महत्त्वाचा आहे.

पुढील काळात दहिगाव, लव्हे आणि वांगी-१ येथेही ५ एमव्ही क्षमतेचे फिडर्स कार्यान्वित होणार असून, कुंभेज येथे मंजूर ३३/११ उपकेंद्राच्या उभारणीसाठी जागा उपलब्ध झाली आहे. ढोकरी येथेही असेच उपकेंद्र उभारले जाणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.कार्यक्रमात व्यासपीठावर आदिनाथ माजी संचालक धुळाभाऊ कोकरे, महादेव पोरे, दत्तात्रय देशमुख, हणुमंत सरडे, राजाभाऊ कदम, श्रीमान चौधरी, सरपंच विकास गलांडे, हभप विठ्ठल महाराज पाटील, आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.प्रास्ताविक आमदार पाटील गटाचे प्रवक्ते सुनील तळेकर यांनी केले, तर आभार उपसरपंच आनंद नाईकनवरे यांनी मानले. यावेळी विविध मान्यवरांनी भाषणे करत आमदार पाटील यांच्या कार्याचे कौतुक केले.



### राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांची मागणी

# ताडोबा अंधारी व्याघ्रप्रकल्पात प्रवेश करण्यासाठी असलेल्या प्रमुख पद्मापूर येथील प्रवेश द्वाराचे भौतिक सुविधेसह भव्य नूतनीकरण करा

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

देशासह महाराष्ट्र राज्याकरिता असलेले वैभव म्हणजे ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, या व्याघ्र प्रकल्पात सफारी करता देश विदेशातील अनेक पर्यटक येत असतात. या व्याघ्र प्रकल्पातील वाघांचे दर्शन घेण्याकरिता सर्वाधिक सफारी करणेकरीता असलेल्या सर्वाधिक जिप्सी याच मार्गावरून जात असल्याने पर्यटकांना या मार्गावर असलेल्या संपूर्ण गेटची भुरळ असते. यामुळे या व्याघ्र प्रकल्पात प्रवेश करण्याकरिता चंद्रपूर तालुक्यातील मौजा पद्मापूर येथे असलेल्या पद्मापूर गेट येथे पर्यटकांकरिता भौतिक सुविधा निर्माण करीत या गेटचे भव्य नूतनीकरण करावे अशी मागणी वनमंत्री गणेश नाईक यांचेसह स्थानिक अधिकारी यांच्याकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष नितीन भटारकर यांनी निवेदनाद्वारे केली.

या पद्मापूर गेट ते मोहरली गेट या अंतरा मध्ये पर्यटकांसाठी पर्यटन करण्याकरिता दोन गेट असून त्या दोन्ही गेटच्या माध्यमातून अनेक जिप्सी द्वारे जंगल सफारी होते. परंतु वन विभागातर्फे फक्त मोहरली या गेटचेच अत्याधुनिक स्वरूपात सौंदर्यीकरण करण्यात आले, जंगला बाबतची माहिती तसेच पर्यटकांकरिता असलेल्या सोयी सुविधा तिथे निर्माण करण्यात आल्या. मात्र या संपूर्ण जंगलात प्रवेश करण्याकरिता असलेल्या मौजा पद्मपूर येथील पद्मापूर गेटचे अजूनही मात्र नूतनीकरनासह सौंदर्यकरण करण्यात आले नाही.

एक प्रकारे या गेटकडे पूर्णतः दुर्लक्षच झालेले आहे. या गेटवर कोणत्याही पर्यटकांना किंवा सभोवतालच्या नागरिकांना या जंगलात प्रवेश करताना या मुख्य गेटवरच नोंदणी करावी लागते. या मुख्य गेट व्यतिरिक्त जंगलात जाण्याकरिता



कोणत्याही गेटवर नोंदणी ची प्रक्रिया पार पडत नाही व म्हणून या मोजा पद्मापूर गेटचे देखील भव्य स्वरूपात नूतनीकरण करून येथे पर्यटकांसाठी भौतिक सुविधा देखील उपलब्ध व्हायला हव्या, कारण चंद्रपूर लगतचे अनेक पर्यटक हे आपल्या परिवाराला घेऊन जेव्हा जंगल फिरायला येतात तेव्हा शहरातून आल्यानंतर या गेटवर थांबा असतो. परंतु इथं पर्यटकांकरिता साध्या स्वच्छतागृहाची देखील सुविधा नसल्याने पर्यटक या गेटवरून एन्ट्री करून जवळपास पंधरा ते वीस किलोमीटर आत येऊन परत याच गेट मार्गे परत जातात. जंगलात कुठेही नियमानुसार थांबता येत नाही, खाली उतरता येतं नाही त्यामुळे मात्र स्थानिक पर्यटकांची मोठी गैरसोय होते. व म्हणून पर्यटकांच्या सोयी सुविधेच्या दृष्टिकोनातून येथे स्वच्छतागृहाची देखील निर्मिती झाली पाहिजे. सोबतच या ठिकाणी जेव्हा या गेटच्या सौंदर्यकरनसाह या ताडोबा बद्दलचा संपूर्ण इतिहास, या जंगलातील यापूर्वीच्या व आता अस्तित्वात असलेल्या वाघांबद्दलचा इतिहास याबाबत माहितीसह जंगला बाबतची भौगोलिक संरचना याच्याबद्दल इत्यंभूत माहिती असणारे फलक सुद्धा तयार करण्यात यावे जेणेकरून देश विदेशातील पर्यटकांना या गेटवरूनच प्रवेश करतानाच इत्यंभूत माहिती मिळणार याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी यांचेमार्फत राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे केली असुन प्रभारी मुख्य वनसंरक्षक श्री पाठक यांची प्रत्यक्ष भेट घेत केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे चंद्रपूर विधानसभा अध्यक्ष सुनील काळे, जेष्ठ नेते अशोक बोरीकर उपस्थित होते.

## सरपंच किरण घोंगडे यांच्या पाठपुराव्याला यश; रखडलेला रस्ता कामाला सुरुवात

### कंत्राटदार मंगेश बांगर यांच्याकडून सरपंचांचा सत्कार



**औंढा नागनाथ | प्रतिनिधी**

तालुक्यातील देवळा फाटा ते अंजनवाडा ते सिद्धेश्वर मार्गाचे काम गेल्या अनेक दिवसांपासून रखडले होते. मात्र अंजनवाडा ग्रामपंचायतीचे सरपंच किरण घोंगडे यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देत सार्वजनिक बांधकाम विभाग औंढा नागनाथ येथे सातत्याने पाठपुरावा केला. काम रखडण्यामागील अडथळ्यांची माहिती घेऊन विविध पातळ्यांवर निवेदने देत त्यांनी हा विषय शासनदरबारी पोहचवला. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून सदर रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे.या यशस्वी प्रयत्नाबद्दल कंत्राटदार मंगेशजी बांगर यांनी सरपंच किरण घोंगडे यांचा पुष्पहार घालून सत्कार केला.यावेळी उपसरपंच उत्तमराव चव्हाण तसेच कंत्राटदार मंगेश बांगर उपस्थित होते. सरपंच घोंगडे यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि बांगर यांचे आभार मानले.

## शरदचंद्र पवार विद्यालयातील विद्यार्थी,निकालात झळकले–पालकांचे समाधान मनमोकळे

**मूल | प्रतिनिधी**

अंकुर बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ सावली यांच्या देखरेखीखाली चालणाऱ्या शरदचंद्र पवार विद्यालय भेजगाव येथील विद्यार्थ्यांनी मार्च २०२५ मध्ये झालेल्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत घवघवीत यश संपादन करून विद्यालयाचा नाव उजळवला आहे. यंदाही या शाळेने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवत परिसरातील शैक्षणिक मान वाढवली आहे.

शरदचंद्र पवार विद्यालय भेजगाव, जी मुल तालुक्यातील भेजगाव आणि आजूबाजूच्या सिंतळा, येरगाव, पिपरी दीक्षित, चक घोसरी, दुगाळामाल, चकदुगाळा, हळदी, दहेगाव अशा अनेक गावांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणारी एकमेव संस्था आहे, या शाळेने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या



उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.यंदाच्या निकालात, वर्ग १२ वी कला शाखेचा एकूण टक्केवारी ६८.०८ टक्के असून, प्रथम क्रमांक कु. कल्याणी भाऊराव गेडाम यांनी ६९.१७ टक्के गुण मिळवले, तर द्वितीय क्रमांक कु. अनुराधा ईश्वर शेरकी यांचा ६५.६७ टक्के आणि तृतीय क्रमांक ६३.१७ टक्के गुणांनी आलेल्या विद्यार्थिनीने पटकावला आहे. वर्ग १० वीचा निकाल ८७.८० टक्के असून, या वर्गात अनिकेत जीवनदास मोहुर्ले यांनी ८१.६० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. कृतिक नरेंद्र भुरसे यांचा द्वितीय क्रमांक ७९.८० टक्के आणि नितीन विनोद घोंगडे यांचा तृतीय क्रमांक ७८.४० टक्के गुणांनी राहिला आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे पालकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, संपूर्ण परिसरात आनंद पसरला आहे. शाळेच्या प्राचार्या कु. भारती पी. मोटघरे, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे प्रोत्साहन करत त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.शालेय व्यवस्थापनानेही विद्यार्थ्यांच्या मेहनतीस योग्य तो गौरव देत, पुढील काळातही अशाच यशस्वी निकालाची अपेक्षा व्यक्त केली आहे. या यशामुळे शरदचंद्र पवार विद्यालयाच्या शैक्षणिक कामगिरीला नवी उंची लाभली आहे.

## ऑपरेशन सिंदूर च्या यशानंतर राजुरा शहरात भव्य तिरंगा यात्रा

### एक तास सेनेसाठी, एक साथ देशासाठी घोषणांनी शहर निनादले

**राजुरा | प्रतिनिधी**

भारतीय लष्कराच्या ऑपरेशन सिंदूर या यशस्वी कारवाईनंतर देशाच्या वीर जवानांना सलाम करण्यासाठी आणि त्यांचा सन्मान करण्यासाठी आज राजुरा शहरातून सिंदूर सन्मान तिरंगा यात्रा काढण्यात आली. संध्याकाळी ६.४५ वाजता सुरू झालेल्या या दुचाकी यात्रेला शहरवासीयांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.दहशतवाद्यांच्या पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने यशस्वीरित्या राबवलेल्या ऑपरेशन सिंदूर ने शत्रूच्या मनसुब्यांचा चांगलाच समाचार घेतला. या यशामुळे भारावलेल्या आणि कृतज्ञतेने भारलेल्या जनतेने भारत माता की जय आणि हम सेना के साथ हैं अशा घोषणांनी संपूर्ण राजुरा शहर दुमदुमून टाकले.

तिरंगा यात्रेची सुरुवात भारत लॉज चौकातून झाली. रामपूरमार्गे चुनाळा परिसरात फिरून



ही यात्रा पुन्हा भारत लॉज चौकात संपन्न झाली.यात्रेच्या प्रारंभी माजी सैनिकांचा स्मृतिचिन्ह देऊन विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी आमदार देवराव भोंगळे यांच्यासह तहसीलदार ओमप्रकाश गोंड, नगर परिषदेचे मुख्याधिकारी येमाजी धुमाळ, पोलीस निरीक्षक सुमित परतेकी, भाजपचे जिल्हा महामंत्री विवेक बोढे, माजी सैनिक गुरुदास कोपुलवार, सुरेश गीरटकर, शंकर मेंगरे, गणेश दुबे, सुरेश तोडसाम, तुकाराम मडावी, निशा मोहुर्ले आणि भोयर यांची प्रमुख उपस्थिती होती.

एक तास सेनेसाठी, एक साथ देशासाठी या घोषणेसह नागरिकांनी लष्कराबद्दल आपली कृतज्ञता आणि अभिमान व्यक्त केला.

### शिक्षकांवर अन्याय करणारा 'तो' शासन निर्णय रद्द करा

## आमदार सुधाकर अडबाले यांची शिक्षण राज्यमंत्री, प्रधान सचिवांकडे मागणी

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

शैक्षणिक सत्र २०२४-२५ ची शिक्षक संचमान्यता राज्यातील बहुतांश शाळांना नुकतीच वितरीत करण्यात आलेली आहे. यात प्रामुख्याने संचमान्यतेत राज्यातील अनेक शाळांना शुन्य शिक्षक मंजूर झाल्यामूळे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसमोर गंभीर समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे दि. १५ मार्च २०२४ रोजीचा संचमान्यतेबाबतचा अन्यायकारक शासन निर्णय रद्द करण्याबाबत आमदार सुधाकर अडबाले यांच्या नेतृत्वात विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या कार्यालयासमोर नुकतेच एक दिवसीय विदर्भस्तरीय धरणे / निदर्शने आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर विमाशि संघाचे



सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांनी मंत्रालयात शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, प्रधान सचिव रणजीत देओल, उपसचिव तुषार महाजन यांची भेट घेऊन विषयाची गंभीरता लक्षात आणून दिली.

दि. २८ ऑगस्ट २०१५ च्या शासन निर्णयानुसार यापूर्वीचे संच निर्धारण होत होते. त्याप्रमाणेच शैक्षणिक सत्र २०२४-२५ चे संच निर्धारण करण्यात यावे व दि. १५ मार्च २०२४ रोजीचा शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा अन्यायकारक शासन निर्णय रद्द करावा, या प्रमुख मागणीसाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने झालेल्या धरणे/ निदर्शने आंदोलनाचे निवेदन आमदार सुधाकर अडबाले यांनी शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, प्रधान सचिव रणजीत देओल यांना दिले व शिक्षकांवर अन्याय करणारा सदर शासन निर्णय रद्द करावा, अशी मागणी लावून धरली.

## महावितरणच्या हलगर्जीपणामुळे तीन जनावरांचा करुण अंत; गावकऱ्यांचा संताप

### वादळी वाऱ्यामुळे तुटलेल्या विजेच्या तारांना जनावरांचा स्पर्श; शेतकऱ्याचे मोठे नुकसान

**वरोरा | प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यातील वडधा तु. शेजारील शेतात विजेच्या तारा तुटून पडूनही महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी वेळेवर खबरदारी न घेतल्याने गुरुवारी सकाळी तीन जनावरांचा विजेचा धक्का बसून मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून गावकऱ्यांनी महावितरणच्या निष्काळजीपणाचा तीव्र निषेध केला आहे.

बुधवारी (१६ मे) सायंकाळी पावणे सहाच्या सुमारास आलेल्या वादळी वाऱ्यामुळे वडधा तु. शेजारी असलेल्या शेतात विजेच्या तारा तुटून जमिनीवर पडल्या. याची माहिती गावकऱ्यांनी तात्काळ चारगाव बु. येथील महावितरणच्या उपकेंद्रातील सहाय्यक अभियंता व लाईनमन यांना वारंवार फोन करून दिली. मात्र, संबंधित कर्मचाऱ्यांनी संपूर्ण रात्र उलटूनही वीजपुरवठा खंडित



केला नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी वसंता घुघल हे नेहमीप्रमाणे जनावरे चारण्यासाठी शेतात घेऊन गेले असता, अशोक डोमाजी मत्ते यांच्या शेतात पडलेल्या जिवंत विजेच्या तारांना स्पर्श होऊन एका बैल, एका गाय व एका वासराचे मृत्यू झाले. सुदैवाने पुढील इतर जनावरे दूर पळवून त्यांनी मोठा अनर्थ टळवला.

घटनेनंतर गावकऱ्यांनी महावितरणच्या निष्क्रियतेवर संताप व्यक्त करत संबंधित शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्याची जोरदार मागणी केली आहे. आधीच शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे आर्थिक अडचणीत असलेले शेतकरी अशा आकस्मिक नुकसानीमुळे आणखी खचून गेले आहेत.

दरम्यान, घटनेचे पंचनामे वडधा तु. चे पटवारी पवार यांनी केले असून यावेळी पोलीस पाटील रिता प्रमोद लेडांगे, बाळकृष्ण डाहुले, मंगल बुरान यांच्यासह अनेक नागरिक आणि महिला उपस्थित होत्या. पशुवैद्यकीय अधिकारी यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासणी केली आहे.

या प्रकरणी विचारणा केली असता, सहाय्यक अभियंता रामटेके यांनी माझ्याकडे केवळ लाईट डिम असल्याची माहिती आली होती, तारा तुटल्याची कोणतीही माहिती मिळालेली नाही, असे स्पष्ट केले.

## लिंगायत संघर्ष समिती महिला आघाडीच्या पाथर्डी तालुका अध्यक्ष पदावर रेणुका फुलशेटे यांची निवड

**अहिल्यानगर | वजीर शेख**

संपूर्ण महाराष्ट्रातील लिंगायत बांधवांचे नेतृत्व करणाऱ्या लिंगायत संघर्ष समितीच्या महिला आघाडीच्या पाथर्डी तालुका अध्यक्ष पदावर रेणुका फुलशेटे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीची अधिकृत घोषणा लिंगायत संघर्ष समितीचे राज्य समन्वयक तथा सहकार शिरोमणी शमीकाकासाहेब कोयटे, प्रदेश अध्यक्ष सुनिल रुकारी, कार्याध्यक्ष सरलाताई पाटील यांच्या संमतीने अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष संतोष जिरेसाळ यांनी निवडीचे पत्र फुलशेटे यांना प्रदान केले.

महात्मा बसवेश्वर यांच्या प्रेरणेतून भारतात प्रथम महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क प्राप्त झाले, याची महती सर्वत्र पोहोचवून, महिलांचे संघटन करुन त्यांच्या न्याय व हक्कासाठी काम करण्याचा संकल्प रेणुका फुलशेटे यांनी यावेळी व्यक्त केला.

फुलशेटे यांच्या या निवडीबद्दल लिंगायत नेते प्रभाकर अण्णा इजारे, लिंगायत संघर्ष समितीचे



पाथर्डी तालुका अध्यक्ष सचिन फुटाणे, उपाध्यक्ष सुहास शेळगावकर, तसेच गजानन तारापुरे, अभिजीत गुजर व संजीवकुमार चेलवे यांसह अनेक नेत्यांनी त्यांचे मनपूर्वक अभिनंदन केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .